# नियमित दिवाणी मुकदमा क्र.१८२/२०१६ मधील नि.३६ खालील आदेश
**(CNR-MHSN090009882016)**

वादी यांनी प्रस्तूत अर्ज दिनांक २६.०२.२०२० रोजी नि.२६ व नि.१ वर केलेला आदेश रद्द करणेबाबत केलेला आहे.

२. वादी यांचे कथनाप्रमाणे, प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक १२.०१.२०१७ रोजी कैफियत दिल्यानंतर दिनांक ०७.०४.२०१८ रोजी न्यायालयाने मुद्दे काढले आहेत व दिनांक १७.०७.२०१८ रोजी वादीने त्याचेतर्फे वटमुखत्यार यांची नेमणूक करुन नि.२६ अन्वये सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीने सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेनंतर प्रतिवादीने वादीचे वटमुखत्यारव्दारे सरतपास दाखल करणेस नि.२९ ला अर्ज देवून हरकत घेतली, परंतू सदरचा अर्ज दिनांक १७.०८.२०१९ रोजी नामंजूर करण्यात आला. प्रस्तुत कामी नि.२९ नामंजूर झालेनंतर वादी व तर्फे वकील काही तारखांना अपरिहार्य कारणामुळे गैरहजर राहिले. दिनांक २६.०२.२०२० रोजी प्रस्तुत प्रकरण उलटतपासासाठी नेमण्यात आले होते. तथापि त्या कालावधीमध्ये वादीचे वटमुखत्यारधारक यांचे जवळचे नातेवाईक मयत झालेमुळे वादीचे वटमुखत्यारधारक मे.कोर्टात गैरहजर राहिले. तथापी वादीतर्फे वकीलांनी नि.३५ अन्वये प्रस्तुत कामी मुदत मागणेचा अर्ज दिला होता, परंतू तो नामंजूर करण्यात आला व वादीचा पुरावा डिस्कार्ड करण्याबाबत न्यायालयाने आदेश पारित केला व नि.१ वर आदेश करुन वादीचा पुरावा बंद करण्यात आला. वादी हे जाणुनबुजून न्यायालयात गैरहजर राहिले नाहीत. वादीचा पुरावा डिस्कार्ड झालेस वादीचे अपरिमित नुकसान होणार असून न्याय हक्कास मुकावे लागणार आहे. सबब, दिनांक २६.०२.२०२० रोजी नि.२६ व नि.१ झालेला आदेश रद्द करणेत यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन अर्जास नाकबुल केला आहे. प्रतिवादीने असे अभिकथन केले आहे की, वादीने नि.३५ चे अर्जामध्ये मयताचे उत्तराकार्याकरिता गेलो असल्याचे नमूद केले आहे मात्र नि.३६ चे अर्जामध्ये वेगळेच कारण नमूद केले आहे. वादी यांनी नि.२६ अन्वये सरतपास दिल्यानंतर प्रतिवादी यांचा नि.२९ चा अर्ज नामंजूर झालेनंतर वादी यांनी नि.३३,३४ व ३५ अन्वये मुदतीचे अर्ज दिले आहेत. वादी यांना वेळोवेळी संधी देवूनही वादीने न्यायालयात हजर राहणेस टाळाटाळ केली आहे. त्यामूळे वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादीनी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी त्यांचे अर्ज व म्हणणेनुसार युक्तिवाद केला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपाकरिता व हक्कज्ञापनाकरिता केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांनी दिनांक १७.०७.२०१८ रोजी नि.२६ अन्वये सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी दिनांक १७.११.२०१८ रोजी नि.२९ पुरावा डिस्कार्ड करणेचा अर्ज दिला असून तो दिनांक २४.०७.२०१९ रोजी नामंजूर करण्यात आला व त्यानंतर प्रकरण हे वादीच्या उलटतपासाकरिता नेमण्यात आले. त्यानंतर वादी यांनी उलटतपासाकरिता हजर न राहता नि.३३,३४ व ३५ अन्वये मुदत अर्ज दिले. वादीला ब–याच संधी देवूनही वादी उलटतपासाकरिता हजर न राहिल्यामूळे वादीचा नि.३५ चा मुदत अर्ज नामंजूर करुन वादीचा पुरावा डिस्कार्ड करुन नि.१ वर आदेश करुन वादीचा पुरावा बंद करण्यात आला आहे. वादी यांना ब–याच संधी देवूनही ते साक्षीकरिता हजर राहिलेले नाहीत. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कथनाच्या पृष्ठयर्थ कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. यावरुन वादी हे सरतपासाचे शपथपत्राचे दाखल करुनही साक्षीकरिता हजर राहिले नाहीत असे स्पष्ट होते. दाव्याचे स्वरुप व मागण्या पाहता दाव्याचे अंतिम गुणदोषात्मक न्यायनिर्णयाकरिता प्रस्तुत प्रकरणात वादी यांचा पुरावा नोंदविणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. या सर्वांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. वादी यांचा नि.३६ कडील अर्ज दंड रक्कम रु.५००/– (रुपये पाचशे मात्र) प्रतिवादीस देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी दंड रक्कम भरुन नेमले तारखेस साक्षीदारास उलटतपासाकरिता हजर ठेवणेचे आहे.

Jyotimala Chandrashekhar Gupta
Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2021.03.01 12:05:05 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.२६.०२.२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U.P.Patil |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 26.02.2021. |
| Order signed by the Presiding officer on | : | 26.02.2021. |
| Order uploaded on | : | 01.03.2021. |